**MHWS040018762022**

दाखल तारीख :— १३/१०/२०२२
नोंदणी तारीख :— १३/१०/२०२२
निकाल तारीख :— २६/०३/२०२५
कालावधी :— ०२ वर्ष ०५ म १३ दि

## भाग 'अ'

| | |
|---|---|
| **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मंगरुळपीर, जि. वाशिम यांचे न्यायालयात (पिठासिन अधिकारी सुभाष द. तारे)** | |
| **नियमित फौजदारी खटला क्रं. २९०/२०२२** | **निशाणी क्र. ४१** |
| गुन्हा नोंद क्र. व पोलीस ठाणे | गुन्हा नोंद क्र. १४७/२०२२<br>पोलीस ठाणे मंगरुळपीर |
| अभियोगपक्ष | महाराष्ट्र शासन तर्फे पोलीस ठाणे अंमलदार, पोलीस ठाणे मंगरुळपीर, ता. मंगरुळपीर, जि. वाशिम. |
| प्रतिनिधीत्व | सहा. सरकारी अभियोक्ता श्री. व्ही. डी. आरु. |
| आरोपी | १) किशोर ज्ञानदेव गयधर,<br>वय ३५ वर्षे, धंदा:— शेतमजुरी,<br>२) कुसुम ज्ञानदेव गयधर,<br>वय ५५ वर्षे, धंदा:— शेती,<br>३) सौ. वंदना शरद घोडीले,<br>वय २८ वर्षे, धंदा:— शेती,<br>४) सागर ज्ञानदेव गयधर,<br>वय २५ वर्षे, धंदा:— शेती,<br>५) सौ. शालु अशोक शिंदे,<br>वय २८ वर्षे, धंदा:— शेती,<br>६) शरद रामकृष्ण घोडीले,<br>वय ४५ वर्षे, धंदा:— शेती,<br>सर्व. रा. अकोली, ता. अकोट, जि. अकोला. |
| प्रतिनिधित्व | वकील श्री. आर. डी. मदनकर |

## भाग 'ब'

| | |
|---|---|
| गुन्हयाची तारीख | दिनांक<br>१०/११/२०१९ ते<br>२३/१२/२०२१ पर्यंत |
| फिर्याद पोलीस ठाण्यात नोंदविल्याची तारीख | २५/१२/२०२१ |
| दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केल्याची तारीख | १३/१०/२०२२ |

| | |
|---|---|
| आरोपींविरूध्द दोषारोप निश्चित केल्याची तारीख | २८/०३/२०२४ |
| पुरावा नोंदविण्यास ठेवलेली प्रथम तारीख | १०/०४/२०२४ |
| निकालाची तारीख | २६/०३/२०२५ |
| जर शिक्षा दिली तर त्या आदेशाची तारीख | संबंधित नाही |

आरोपींबाबत तपशिल

| अ. क्र. | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | दोषारोप ठेवलेले गुन्हे | निर्दोष मुक्त केले की शिक्षा केली | दिलेली शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ प्रमाणे संपरिक्षे दरम्यान निरूध्द केलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | आरोपी क्र. ०१ ते ०६ | अटक नाही. | १३.१२.२०२३ व २२.०२.२०२४ | कलम ४९८ (अ) ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ भा.दं.वि. प्रमाणे | निर्दोष मुक्त | लागु नाही | —— |

**<u>भाग ‘क’</u>**

फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४

अ. साक्षीदारांची यादी

| साक्षीदार क्रमांक | निशाणी क्र. | नाव | साक्षीदाराची भुमिका |
|---|---|---|---|
| १ | ३७ | कोमल किशोर गयधर | फिर्यादी |
| २ | ४० | मिना दिपक पुखवाल | साक्षीदार |

ब. बचावाचे साक्षीदार — निरंक

क. अभियोगपक्षाच्या/बचावपक्षाच्या कागदपत्रांच्या निशाणींची यादी — निरंक

बचावपक्षाने कबुल केलेल्या दस्तांची यादी — निरंक

# न्यायनिर्णय
## (पारित दिनांक २६/०३/२०२५)

१. अभियोगपक्षाची थोडक्यात हकीगत अशी की, फिर्यादी कोमल किशोर गयधर यांचा विवाह आरोपी क्र. ०१ याच्यासोबत झाला. आरोपी क्र. ०२ ते ०६ हे त्यांच्या पतीचे नातेवाईक आहेत. लग्नानंतर त्यांना ०७ ते ०८ महिने चांगले नांदविले व त्यानंतर फिर्यादीस त्रास देणे सुरु झाले. त्यानंतर फिर्यादी ही गरोदर असतांना मुलगी झाल्यास वागविणार नाहीत असे आरोपी फिर्यादीस म्हणत असत. फिर्यादी बाळंतपणाकरीता माहेरी गेली व तिला मुलगा झाला. त्यानंतर देखील आरोपी हे तिला अथवा मुलाला पाहण्यासाठी आले नाहीत. दिवाळी सणापूर्वी फिर्यादीचे पती फिर्यादीस नेण्यास आल्यावरुन फिर्यादी सासरी गेली. त्यानंतर तिचा पती, सासु, कुसुम, ननंद वंदना, शालु हे सर्व तिला शिवीगाळ करुन छळ करीत असत. तसेच लग्नात काही दिले नाही, तुझे वडील भिकारी आहे, लग्नात वडीलांनी हुंडा दिला नाही, तु वडीलांकडुन पैसे घेवून ये नाही तर तुला वागवित नाही असे फिर्यादीस म्हणत असत. फिर्यादीचा दिर सागर व ननंदेचा पती शरद हे आरोपी क्र. ०१ यास भडकावून देत असत. त्यामुळे आरोपी क्र. ०१ हा फिर्यादीस मारहाण करीत असत. फिर्यादीची सासु तिला नेहमी टोचुन बोलत असे व आरोपी क्र.०१ याचे दुसरे लग्न करुन देते असे टोमणे मारीत असे. दिनांक २३.०२.२०२१ रोजी सकाळी ७.३० वाजेच्या दरम्यान फिर्यादीच्या पतीने व सासुने तिला शिवीगाळ करुन थापड बुकयांनी मारहाण केली व घराबाहेर हाकलुन दिले. तसेच पुन्हा आली तर जिवाने मारण्याची सर्व आरोपींनी तिला धमकी दिली. त्यामुळे फिर्यादी तिच्या मुलासह माहेरी आली.

२. दिनांक २५.१२.२०२१ रोजी पोलीस ठाणे मंगरुळपीर येथे दिलेल्या तक्रारीवरुन आरोपींविरुध्द गुन्हा नोंद क्र. १४७/२०२२ हा भा.दं.वि.चे कलम ४९८—अ, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ अन्वये नोंद करण्यात आला व सदर गुन्हयाचा तपास नायक पोलीस कॉन्स्टेबल श्री रामराव लडके ब. क्र. ११५० यांच्याकडे सोपविण्यात आला.

**३.** तपासीक अंमलदार यांनी तपास पुर्ण करुन आरोपींविरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम ४९८—अ, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केल्याबद्दल दोषारोपपत्र पाठविले.

**४.** माझे पुर्वाधिकारी यांनी आरोपींविरूध्द निशाणी २२ कडे भा.दं.वि चे कलम ४९८—अ, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केल्याबाबत दोषारोप निश्चीत केला आहे. आरोपींना दोषारोप वाचुन व समजावून सांगण्यात आला. त्यांनी गुन्हा कबुल केला नाही व संपरिक्षेची मागणी केली.

**५.** आरोपींविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने साक्षीदार क्र. ०१ फिर्यादी कोमल किशोर गयधर यांना निशाणी ३७ कडे व साक्षीदार क्र. ०२ मिना दिपक पुखवाल यांना निशाणी क्र. ४० कडे तपासले आहे. साक्षीदार क्र.०१ फिर्यादी व साक्षीदार क्र. ०२ यांनी अभियोगपक्षास समर्थन न केल्यामुळे अभियोगपक्षाचे इतर साक्षीदार तपासून कोणताही उपयोग होणार नव्हता. तसेच फिर्यादी व आरोपी यांनी तडजोडपत्र दाखल केलेले आहे. त्यामुळे आज रोजी निशाणी क्र.०१ कडील आदेशाप्रमाणे अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. आरोपींविरुध्द कोणताही पुरावा दिसून न आल्यामुळे आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३ अन्वये निवेदन वगळण्यात आले.

**६.** सहाय्यक सरकारी विधिज्ञ व आरोपींचे विद्वान विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील पुराव्याचे अवलोकन केल्यानंतर व उभय वकीलांचा युक्तिवाद ऐकल्यानंतर खालील मुद्दे उपस्थितीत होतात. त्यावरील निष्कर्ष यानंतर नमुद केलेल्या कारणांमुळे नोंदविले आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | आरोपींनी त्यांच्या समान हिताच्या पुरसरणार्थ लग्नात कमी हुंडा दिल्याच्या कारणावरुन व माहेरावरुन पैसे आणण्याच्या कारणावरुन फिर्यादीचा शारिरीक व मानसिक छळ केला आणि त्याद्वारे भा.दं.वी चे कलम ४९८—अ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | नाही. |

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| २ | आरोपींनी त्यांच्या समान हिताच्या पुरसरणार्थ फिर्यादीला मारहाण करुन इच्छापूर्वक दुखापत केली व त्याद्वारे भा. दं. वि. चे कलम ३२३ सह कलम ३४ अन्वयेचा गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे काय ? | नाही. |
| ३ | आरोपींनी त्यांच्या समान हिताच्या पुरसरणार्थ फिर्यादीच्या हातुन सार्वजनिक शांततेचा भंग घडवुन आणण्याच्या दृष्टीने तिला शिवीगाळी करून अपमानित केले व त्याद्वारे भा. दं. वि. चे कलम ५०४ सह कलम ३४ अन्वयेचा गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे काय ? | नाही. |
| ४ | आरोपींनी त्यांच्या समान हिताच्या पुरसरणार्थ फिर्यादीला जिवे मारण्याची धमकी दिली व त्याद्वारे भा. दं. वि. चे कलम ५०६ सह कलम ३४ अन्वयेचा गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे काय ? | नाही. |
| ५ | काय आदेश ? | अंतिम आदेशा प्रमाणे |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्र. ०१ ते ०४ बाबत

**७.** उपरोक्त सर्व मुद्दे एकाच घटनेशी निगडीत असल्याकारणाने पुनरावृत्ती टाळण्यासाठी सर्व मुद्दे एकत्रितरित्या विचारात घेण्यात येत आहेत.

**८.** साक्षीदार क्र. ०१ या फिर्यादी आहेत. तिच्या सरतपासात असे आले आहे की, आरोपी क्र. ०१ हा तिचा पती आहे व इतर आरोपी हे तिच्या पतीचे नातेवाईक आहेत. तिचे लग्न आरोपी क्र. ०१ सोबत दिनांक १०.११. २०२१ रोजी झाले होते. लग्नानंतर तिचे पतीसोबत घरगुती कारणांवरुन किरकोळ वाद झाले होते. त्याबाबत तिने तिच्या पतीस समजावून सांगण्याकरीता इतर आरोपींना सांगितले असता त्यांनी तसे केले नाही, त्यामुळे रागाच्याभरात तिने तक्रार दिली. तिने फिर्यादी जबाबावरील तिची सही मान्य केली असली तरी त्यातील मजकुराबाबत अनभिन्नता दर्शविलेली आहे. आरोपींनी तिचा छळ

केल्याची, तिला मारहाण केल्याची अथवा अपमान केल्याची कोणतीही घटना घडल्याचे तिने नाकारले आहे.

९. फिर्यादी अभियोगपक्षास समर्थन करीत नसल्यामुळे सहाय्यक सरकारी वकील यांनी तिला उलटतपासात विचारण्यासारखे प्रश्न न्यायालयाच्या परवानगीने विचारले, परंतु त्यातुनही अभियोगपक्षास समर्थनीय अशी कोणतिही बाब आलेली नाही. आरोपींनी तिचा शारिरीक व मानसिक छळ केल्याचे तिने नाकारले आहे. याउलट आरोपींसोबत तडजोड झाल्याची बाब ती मान्य करते.

१०. साक्षीदार क्र. ०२ मिना ही फिर्यादीची आई आहे. त्यांनी देखील अभियोगपक्षास कोणतेही समर्थन केले नाही. सहाय्यक सरकारी वकीलांनी त्यांना देखील उलटतपासात विचारण्यासारखे प्रश्न विचारले, परंतु त्यातून देखील अभियोगपक्षास समर्थनीय कोणतीही बाब आलेली नाही.

११. अभियोगपक्षाच्या साक्षीदारांच्या तोंडी कथनावरुन आरोपींनी विविक्षीत गुन्हे केल्याचे मानता येणार नाही. तक्रारदार व तिचे नातेवाईक आणि आरोपींमध्ये न्यायालयाबाहेर तडजोड झाली आहे व त्याप्रमाणे पुरसिस नि. ३६ वर दाखल केले आहे. ***मा. सर्वोच्च न्यायालयाने मदनमोहन अबोट वि. स्टेट ऑफ पंजाब २००८ क्रिमिनल लॉ जर्नल २२४३*** मध्ये असे निष्कर्ष नोंदवला आहे की, गुन्हा हा सार्वजनिक हितसंबंधावर परिणाम करणार नसेल व जो केवळ वैयक्तिक स्वरूपाचा असेल तर न्यायालयाने फिर्यादी व आरोपीमधील तडजोडपत्र स्विकारावे कारण न्यायालयामध्ये बरेच खटले प्रलंबित आहेत त्या खटल्यांना वेळ देता येईल तसेच तडजोड झालेल्या प्रकरणात अभियोग पक्षाच्या बाजुने निकाल लागण्याची शक्यता नसेल तर तडजोड स्विकारावी असा निष्कर्ष नोंदवला आहे व या प्रकरणाला वरील निष्कर्ष लागु होतो. तसेच प्रस्तुत प्रकरणात अभियोग पक्षाने स्वतंत्र साक्षीदार तपासले नाहीत. तक्रारदार व आरोपी यांनी तडजोड पत्र दाखल केल्यामुळे अभियोग पक्षाचे पुढील साक्षीदार तपासून कोणताही महत्वपूर्ण पुरावा उपलब्ध होणार नसल्यामुळे अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला आहे. एकंदरीत अभियोग पक्षाच्या वतीने आलेल्या पुराव्या वरुन आरोपींवरील दोषारोप योग्य शंकेच्या बाहेर जाऊन शाबीत झाले असे

म्हणता येणार नाही तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाच्या मदनमोहन अबोट मधील न्यायनिर्णयातील सिध्दांतानुसार फिर्यादी, जखमी व आरोपी मधील तडजोडपत्र विचारात घेऊन मी मुद्दे क्रमांक ०१ ते ०४ चा निष्कर्ष नकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्र. ०५ बाबत**

**१२.** मुद्दा क्रमांक ०१ ते ०४ वरील निष्कर्षांमुळे आरोपी निर्दोष मुक्ततेस पात्र आहेत.

**१३.** फौजदारी प्रक्रीया संहिता, १९७३ चे कलम ४३७—अ अन्वये या न्यायनिर्णयाविरुध्द करण्यात आलेल्या अपील किंवा ईतर कार्यवाहीत हजर राहण्याची हमी म्हणून आरोपींना जामीन देण्याकरीता आदेशीत करणे आवश्यक आहे. सबब आदेश—

**आदेश**

१. फौजदारी प्रकिया संहिता, १९७३ चे कलम २४८ (१) अन्वये आरोपींना भा.दं.वि. चे कलम ४९८—अ, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ अन्वये शिक्षेस पात्र असणाऱ्या गुन्हयातून निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपींचा पुर्वीचा जामीन कद्बा रद्द करण्यात येतो.

३. फौजदारी प्रकिया संहिता, १९७३ चे कलम ४३७—अ अन्वये आरोपींनी प्रत्येकी रक्कम रूपये ५,०००/— चा जात मुचलका व जामीन कद्बा दयावा. आरोपींनी दिलेला जात मुचलका व जामीन कद्बा आज पासून पुढे सहा महिन्यांपर्यंत परिणामकारक असेल.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

स्वा/—

दिनांक :— २६/०३/२०२५

(सुभाष द. तारे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मंगरुळपीर

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/ Order are same word to word as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Court | :- | 2nd Jt. Civil Judge (Jr.Dn.) and J.M.F.C., Mangrulpir, Dist. Washim. |
| Presiding Officer | :- | Subhash D. Tare |
| Judgment uploaded by | :- | A. B. Padole (Stenographer L.G) |
| Date of Judgment | :- | 26.03.2025 |
| Judgment/Order signed by the presiding officer on | :- | 26.03.2025 |
| Judgment/Order uploaded on | :- | 27.03.2025 |